वर्ष १९ वे

अंक ३ रा

**सर्व सभासद / हितचिंतकांस आग्रहाचे निमंत्रण**

## वार्षिक सर्वसाधारण सभा, स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम - निमंत्रण पत्रिका

-: कार्यक्रमाचे स्थळ :-

**डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन,**

**शिवाजीनगर एस.टी.स्टँडसमोर, दळवी हॉस्पीटलच्या बाजूस, पुणे ४११००५**

**रविवार दि.२५.०८.२०१९ रोजी सकाळी १०.०० वा.**




# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

(रजि.नं. एफ/१४२७/पुणे, स्थापना : ०३.१२.१९७९)

**Website : http://www.parnermitramandalpune.com/**

**यांचे मुखपत्र**

# संवाद

**ऑगस्ट-सप्टें.-ऑक्टो.-नोव्हेंबर २०१९**

फक्त सभासदांकरिता
(खाजगी वितरणासाठी)

### वसतिगृहाची वैशिष्ट्ये

- **वाय-फाय सुविधा उपलब्ध.**
- **विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका.**
- इमारतीचे एकूण क्षेत्रफळ १२३१०.०० चौ.फुट (४ मजले व पार्किंग).
- प्रत्येक मजल्यावर ८ खोल्या व २ सेल्फ कंटेन्ड खोल्या.
- खोलीचा आकार १०' x १४'
- एकूण १६० विद्यार्थ्यांची सोय.

### आपण यापैकी काय करु शकतो?

- रु. दहा लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव एका मजल्यास दिले जाईल.
- रु. एक लक्ष व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव खोलीस दिले जाईल.
- रु. ११००० व अधिक देणगी दिल्यास आपण सुचविलेले नाव विशेष फलकावर लावले जाईल.

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

( दिनांक : १० ऑगस्ट, २०१९ )

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि.२५.०८.२०१९** रोजी **सकाळी १०.३० वा. डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन, शिवाजीनगर एस.टी.स्टँडसमोर, दळवी हॉस्पीटलच्या बाजूस**, **पुणे ४११००५** येथे आयोजित केली असून सदर सभेचे कामकाज खालीलप्रमाणे होईल.

१) दि.१९.०८.२०१८ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचा लेखी अहवाल वाचून मंजूर करणे.
२) चार्टर्ड अकौंटंटकडून तपासून आलेल्या २०१८-२०१९ च्या जमाखर्चा संबंधीचा अहवाल वाचून मंजूर करणे.
३) सन २०१९-२०२० साठीच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
४) भावी कार्याची दिशा ठरविणे.
५) सन २०१९-२०२० साठी लेखा तपासणीसाची नेमणूक करणे.
६) घटनेप्रमाणे मंडळाच्या कार्यकारीणीची उपस्थित सभासदांमधून निवड होईल.
७) मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळेचा विषय असल्यास त्याचा विचार करणे.

**सूचना :-**

१) माननीय सभासदांनी वेळेवर उपस्थित रहावे.
२) गणपूर्तीच्या अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच दिवशी सकाळी ११.०० वाजता त्याच जागी ती सभा भरविण्यात येईल व वरील कामकाज पार पाडण्यात येईल.
३) वरील सभेत मांडण्यासाठी ठराव पाठवायचे असल्यास ते सूचक व अनूमोदक यांच्या पूर्ण नावासह आणि सह्यासह **दि.१५.०८.२०१९** पर्यंत मिळतील असे पाठवावेत.

**✽ आपले नम्र ✽**

**हौसाराम घोडके**
अध्यक्ष

**इंजि.विजयकुमार ठुबे**
अध्यक्ष, बांधकाम समिती

**मधुकर शिरोळे**
उपाध्यक्ष

**सुनील पोटे**
सेक्रेटरी

**प्रा.गोरक्ष जगताप**
सहसेक्रेटरी

**बाजीराव जगदाळे**
कार्यवाहक

**अशोक वाबळे**
सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, विलास ठुबे, किरण तिकोने.**

**✽ कार्यक्रमाचे स्थळ ✽**

**डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन,**
**शिवाजीनगर एस.टी.स्टँडसमोर, दळवी हॉस्पीटलच्या बाजूस, पुणे ४११००५**
**रविवार दि. २५.०८.२०१९ रोजी सकाळी १०.०० वा.**
**संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

रजि.नं.एफ/१४२७/पुणे, स्थापना दि. ०३.१२.१९७९

**स.नं.१७/४अ, मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, थेरगाव, पुणे - ४११ ०३३.**

## स्नेह मेळावा, विद्यार्थी व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम

पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे या संस्थेचा वार्षिक स्नेह मेळावा, विद्यार्थी पारितोषिक वितरण व ग्रामस्थ गौरव कार्यक्रम **रविवार दि.२५.०८.२०१९** रोजी **सकाळी १०.०० वा.** पुणे **डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन,** शिवाजीनगर एस.टी.स्टँडसमोर, दळवी हॉस्पीटलच्या बाजूस, पुणे ४११००५ येथे खालील सन्माननियांच्या उपस्थितीत आयोजित केलेला आहे.

### * अध्यक्ष *

**मा.अनिल गुंजाळ,**
सहसंचालक, शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.

### * प्रमुख पाहुणे *

**मा.मनोहर त्रिभुवन**
माजी अप्पर निबंधक,
महाराष्ट्र राज्य

**मा.कृष्णराव शेलार**
माजी सहआयुक्त
राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य

तरी आपण अगत्य उपस्थित रहावे, ही विनंती.

### * आपले नम्र *

**हौसाराम घोडके** — अध्यक्ष
**इंजि.विजयकुमार ढुबे** — अध्यक्ष, बांधकाम समिती
**मधुकर शिरोळे** — उपाध्यक्ष

**सुनील पोटे** — सेक्रेटरी
**प्रा.गोरक्ष जगताप** — सहसेक्रेटरी
**बाजीराव जगदाळे** — कार्यवाहक
**अशोक वाबळे** — सहकार्यवाहक

**सदस्य :- सखाराम गागरे, डॉ.बाळासाहेब बांडे, भाऊसाहेब नरड, सुनील कोल्हे, काशिनाथ गायकवाड, रामदास शिर्के, मुरलीधर चौधरी, बाळासाहेब येणारे, माधव गायके, सुनील निंबाळकर, विलास ढुबे, किरण तिकोने.**

### * कार्यक्रमाचे स्थळ *

**डेक्कन शुगर टेक्नॉलॉजीस्ट असोसिएशन,**
शिवाजीनगर एस.टी.स्टँडसमोर, दळवी हॉस्पीटलच्या बाजूस, पुणे ४११००५
**रविवार दि. २५.०८.२०१९ रोजी सकाळी १०.०० वा.**
**संपर्क - मधुकर शिरोळे ९९२२१६६१२५**

**कार्यक्रमानंतर स्नेहभोजनाचा आस्वाद घ्यावा ही विनंती.**

# संपादकीय

प्रिय सभासद,

मागील वर्षीच्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर या वर्षी आपल्या तालुक्यामध्ये समाधानकारक पावसाची सुरुवात झाली आहे, याचे समाधान वाटते. सरासरीएवढा यावर्षी पाऊस पडेल अशी अपेक्षा आहे. निसर्गाची आपल्या तालुक्यावर अवकृपा असल्याने शिक्षणाच्या बाबतीत आपला तालुका इतरांच्या तुलनेत आघाडीवर आहे. संवादच्या माध्यमातून आपल्या तालुक्यातील यशवंत व्यक्ती व विद्यार्थी यांची माहिति वेळोवेळी आपणापर्यंत आम्ही पोहोचवत असतोच. **कु.श्वेता बांडे, कु.प्राची कदम तसेच कु.धनश्री चेमटे** यांनी मिळविलेले यश हे आपल्या सर्वांना अभिमान वाटेल असेच आहे. त्याचप्रमाणे **धोंडीबा व मंदाकिनी गायखे, संदीप व सचिन या जगताप बंधुंनी** तसेच माझे व्यक्तिगत मित्र **दशरथ बोरूडे** यांनी मंडळावर विश्वास दाखवून सामाजिक कार्यासाठी देणगी दिली, त्याबद्दल त्यांचे प्रती कृतज्ञता व्यक्त करतो.

मंडळाचे अध्यक्ष हौसाराम घोडके यांच्या नेतृत्वाखाली कार्यकारी मंडळ प्रामाणिक काम करीत आहे. त्यामुळे आपण त्यांना दिलेल्या देणगीतून विद्यार्थी वसतिगृहासाठी कपाटे व लोखंडी पलंगाच्या व्यवस्थेचे काम पूर्ण झाले असून अभ्यासिकेचे काम सुरू करण्यात येत आहे. दोन महिन्यामध्ये आपल्या वसतिगृहाची अभ्यासिका सुरू होत आहे. त्याचा फायदा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी घ्यावा, अशी अपेक्षा आहे.

प्राथमिक शिक्षणामध्ये ज्यांनी महत्वाचे योगदान दिले आहे, त्या स्मृतिशेष **संभाजी बोरूडे गुरूजीं**च्या प्रती **रामदास पुजारी** यांनी **'कर्तृत्व पारनेरकरांचे'** या सदरात कृतज्ञता व्यक्त केली आहे. आपणही अशा प्रकारचे लेख या सदरासाठी पाठवावेत ही विनंती.

परत एकदा महिला वसतिगृहाची जमीन उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयत्न करावेत, ही आठवण करून देतो व या संपादकीयास अर्धविराम देतो.

जय जिजाऊ! जय शिवराय!!

**इंजि.विजयकुमार ठुबे**
संपादक

## पारनेर तालुका मित्रमंडळ, पुणे - कार्यकारिणी सदस्य

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| श्री.हौसाराम घोडके | अध्यक्ष | ९४२०६९६७९० | श्री.भाऊसाहेब नरड | सदस्य | ९७६७७२५८११ |
| इंजि.विजयकुमार ठुबे | अध्यक्ष,बां.स. | ९४२२०२६२२५ | श्री.मुरलीधर चौधरी | सदस्य | ९३२५६३५२४१ |
| श्री.मधुकर शिरोळे | उपाध्यक्ष | ९९२२१६६१२५ | श्री.रामदास शिर्के | सदस्य | ९४२२०१६७६४ |
| श्री.सुनील पोटे | सेक्रेटरी | ९२२६९२१०८८ | श्री.सुनील कोल्हे | सदस्य | ९९२२४३४९८६ |
| श्री.प्रा.गोरक्ष जगताप | सहसेक्रेटरी | ९८६०९०७६१८ | श्री.बाळासाहेब येणारे | सदस्य | ९९२२९६४८२५ |
| श्री.बाजीराव जगदाळे | कार्यवाहक | ९०११०२१४३० | श्री.काशिनाथ गायकवाड | सदस्य | ९४२२०१७९४० |
| श्री.अशोक वाबळे | सहकार्यवाहक | ९८८१६०८३५७ | प्रा.माधव गायके | सदस्य | ९८२२९९५०९७ |
| डॉ.बाळासाहेब बांडे | सदस्य | ९८२२०५१५९३ | प्रा.सुनील निंबाळकर | सदस्य | ९४२२२२२०३० |
| श्री.सखाराम गागरे | सदस्य | ९७३००७५०३३ | श्री.विलास ठुबे | सदस्य | ९४२३४६५९८४ |
| | | | श्री.किरण तिकोणे | सदस्य | ९८२२३४६१३८ |

## वसतिगृह प्रवेश

**पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे** चे सर्व सोयींनी युक्त असे **वसतिगृह** मंगलनगर, गल्ली नं. ८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे ४११०३३ येथे असून प्रवेशासाठी खालील पदाधिकायांशी संपर्क साधावा.

**व्यवस्थापक - श्री.संजय जंगम - मो. ९४२३० २२१२३, ९९२१८ ५३३२३ (वेळ दु.३ ते ७)**

# विद्यार्थी गौरव - १०वी


सुजल सुर्यकांत भोगाडे, भोयरे गांगर्डा ९५%


कु.श्रुती अरूण कोल्हे, लोणी हवेली ९४.२%


कु.खुशी किरण खोडदे, गांजीभोयरे ९३.७%


पृथ्वीराज प्रशांत मुळे, किन्ही ९२%


ओंकार अतुल पोळ, पारनेर ९१%


कु.साक्षी किसन कुलट, खातगाव ९०%


अद्वैत योगेश पोटे, बाभुळवाडे ९०%



कु.समृद्धी संतोष कुलकर्णी, बाभुळवाडे ८९%


प्रियांशु श्रीकांत खोडदे, किन्ही ८८.२%


कु.दिया सुशील मुथीयान, कान्हुर पठार ८६.४%


कु.प्राची सुनील कोल्हे, वाडेगव्हाण ८६%


कु.भक्ती अरविंद काळे, सुपे ८४%


आदित्य गणेश व्यवहारे, पारनेर ८२%


निशांत दगडू घुले, पिंपळगाव रोठा ७७.४%


सोहम तुकाराम नरसाळे, गोरेगाव ७६%


अभिजीत राजकुमार वाढवणे, पिंपरी जलसेन ७०.४%


कु.अक्षरा अण्णासाहेब केदार, शहाजापुर ६२%

# विद्यार्थी गौरव - १२वी सायन्स


कु.शेजल धिरज गांधी, पुणे ८७.८०%


करण सुरेश रणशिंग, कडुस पाडळी ८५%


रोहीत मुकुंद सोबले, जामगाव ८२%



अमरेंद्र धनंजय शेंडकर, लोणी मावळा ८१%


कु.शर्वानी नामदेव पडवळ, लोणी मावळा ७५%


कु.अंकिता हरिभाऊ शेळके, नारायणगव्हाण ७२%


कु.स्वरांगी बाळासाहेब येणारे, रायतळे ६८%


सावंत प्रणवकुमार नवनाथ पिंपळनेर ६५.२३%


कु.समृद्धी हेमंत नागवडे, रूई छत्रपती ६५%


कु.अक्षदा ज्ञानेश्वर शेंडकर, लोणी मावळा ६४%


कु.गायत्री जुगलकिशोर रेपाळे, पुणेवाडी ६०%

**१२ वी कॉमर्स →**


कु.श्रेया सुनील वीर, अस्तगाव ९०.१५%


कु.श्रुती संजय झावरे, गारगुंडी ८०%

# ग्रामस्थांचा सत्कार



श्रीमती राधाबाई व गणपत मनाजी गायखे

**सौ.मंदाकिनी धोंडीबा गायखे व श्री.धोंडीबा गणपत गायखे,** रा. कान्हुर पठार यांनी पिताश्री **कै.गणपत मनाजी गायखे** यांचे स्मरणार्थ व मातोश्री **श्रीमती राधाबाई गणपत गायखे** यांचे नावे मंडळास **रू.१,००,०००/–** देणगी दिली. त्यांची आतापर्यंतची एकूण देणगी **रू.१,१७,०००/–** झाली आहे.



सौ.मंदाकिनी व श्री.धोंडीबा गणपत गायखे



कै.विजयाबाई व कै.सखाराम जगताप

**श्री.संदिप सखाराम जगताप व श्री.सचिन सखाराम जगताप,** गोरेगाव या बंधुंनी पिताश्री **कै.सखाराम मारूतराव जगताप** व मातोश्री **कै.विजयाबाई सखाराम जगताप** यांचे स्मरणार्थ मंडळास **रू.१,००,०००/–** देणगी दिली. त्यांची आतापर्यंतची एकूण देणगी **रू.१,१७,०००/–** झाली आहे. विशेष म्हणजे कै.सखाराम जगताप यांनी त्यांच्या मातोश्री अनुसया मारूतराव जगताप यांचे स्मरणार्थ मंडळास एका खोलीसाठी देणगी दिली होती.



श्री.संदिप व सचिन सखाराम जगताप



**सुरक्षा तज्ञ श्री. दशरथ भाऊ बोरूडे** रा. पुणेवाडी यांनी मंडळास **रू.५०,०००/–** देणगी दिली. त्यांची आतापर्यंतची एकूण देणगी **रू.१,१६,५५५/–** झाली आहे.



❊ **डॉ. कु. श्वेता बाळासाहेब बांडे,** रा. टाकळी ढोकेश्वर हिने एम.बी.बी.एस. पदवी संपादन केली आहे.



❊ **डॉ. कु. प्राची बाबाजी कदम,** रा.पिंपरी जलसेन हिने एम.बी.बी.एस. पदवी संपादन केली आहे.



❊ **श्री. रामदास नारायण सोबले,** रा.जामगाव हे टाटा मोटर्स कंपनीत कार्यरत असून त्यांना सामाजिक कामाची आवड आहे. ते समाज प्रबोधनासाठी प्रवचने करतात. झाडे लावा, झाडे जगवा मोहीम चालवितात. गड किल्ल्यांवर प्रत्येक महिन्यात जाऊन स्वच्छता मोहीम राबवितात. आदिवासी समाजामध्ये धान्य वाटप व विद्यार्थ्यांना वह्या–पुस्तके वाटप करतात. नियमितपणे रक्तदान करून रक्तदान शिबिरे आयोजित करतात. अशा अनेकाविध कामामुळे त्यांचा **टाटा मोटर्स तर्फे उत्कृष्ट कामासाठीचा जे.आर.डी. क्वालीटी कंट्रोल अवॉर्ड** देऊन सन्मान करण्यात आला. तसेच **जुन–जुलै २०१८ चा मॅन ऑफ दि मंथ चा पुरस्कार** त्यांना प्रदान करण्यात आला.



**कु.धनश्री भास्कर चेमटे,** रा.वासुंदे ही पहिल्यापासून हुशार विद्यार्थीनी म्हणून शाळेमध्ये प्रसिद्ध होती. तिला खेळामध्ये सुद्धा विशेष प्राविण्य मिळालेले असून पुणे जिल्ह्यातून विभागीय पातळीवर फुटबॉल संघाची कर्णधार म्हणून तिची निवड झाली होती. दहावीमध्ये तिला ९४% मार्क्स मिळाले होते. तसेच बारावीच्या विज्ञान शाखेतून ९८% मार्क्स मिळवून उत्तीर्ण झाली होती. IISER ह्या भारत सरकारच्या शैक्षणिक संस्थेच्या अखिल भारतीय परिक्षेतून साधारणपणे एक लाख मुलांमधून ६०० जणात निवड झाल्यानंतर IISER भोपाळ येथे पाच वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण करून ती **B.S.M.S. (Physics Research) पदवी विशेष गुणवत्तेसह उत्तीर्ण** झाली. त्यानंतर तिची आयआयटी कानपूर मधील **National Flexible Eelectronic Centre ला संशोधन कार्यासाठी निवड झाली.** दोन वर्षाच्या आयआयटी कानपूर येथील अनुभवाने तिला आयआयटी मुंबई या भारतातील एक नंबरवर असलेल्या शैक्षणिक संस्थेत **मटेरियल इंजिनियरिंग मध्ये पी.एचडी. करण्याची संधी** प्राप्त झाली. ती तेथे **नवीन संशोधीत Graphene मटेरियलवर काम करीत आहे.** मुलींना शिक्षणाच्या संधी मिळाल्यास त्या त्याचे सुवर्ण संधीत कसे रुपांतर करतात याचे धनश्री चेमटे ही उत्तम उदाहरण आहे.

**तिच्या पुढील भावी आयुष्यातील वाटचालीस मंडळातर्फे शुभेच्छा !**

# नांदा सौख्य भरे

* प्राचार्य भास्कर हरी झावरे, रा.भोंद्रे यांचे सुपुत्र **चि.पराग** व श्री.पांडुरंग लक्ष्मण बर्वे, रा.वासुंदे यांची सुकन्या **सौ.सुप्रिया** यांचा शुभविवाह **दि.१२.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.भास्करराव झावरे यांनी मंडळास **रू.५०००/–** देणगी दिली.
* श्री.यशवंत दगडू भुसारे, रा.बुगेवाडी यांचे सुपुत्र **चि.प्रदीप** व श्री.भानुदास नानाभाऊ डोंगरे, रा.पांगरी, ता.अकोला, जि.नगर यांची सुकन्या **सौ.श्रद्धा** यांचा शुभविवाह **दि.१२.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.यशवंत भुसारे यांनी मंडळास **रू.५०००/–** देणगी दिली.
* श्री.सुरेश दगडू चेमटे, रा.भाळवणी यांची सुकन्या **सौ.जयश्री** व श्री.विकास शामराव जगताप, रा.सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे यांचे सुपुत्र **चि.सम्राट** यांचा शुभविवाह **दि.१४.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.सुरेश चेमटे यांनी मंडळास **रू.५००१/–** देणगी दिली.
* श्री.गंगाधर पंढरीनाथ गायके, रा.वासुंदे यांची सुकन्या **सौ.कविता (तृप्ती)** व श्री.भाऊसाहेब सोनाजी काळे, रा.पाडळी तर्फे कान्हुर यांचे सुपुत्र **चि.बाळासाहेब (गंगाराम)** यांचा शुभविवाह **दि.१४.०५.२०१९** रोजी संपन्न झाला.
* श्री.एकनाथ नारायण जगदाळे, रा.बाभुळवाडे, यांचे सुपुत्र **चि.नागेश** व श्री.भागुजी धनाजी शिंदे, रा.नळावणे,ता.जुन्नर, जि.पुणे यांची सुकन्या **सौ.वृषाली** यांचा शुभविवाह **दि.१५.०५.२०१९** रोजी संपन्न झाला.
* श्री.मधुकर हौशाभाऊ शिरोळे, रा.पाडळी दर्या, यांचे सुपुत्र **चि.सुश्रुत** व श्री.प्रकाश कृष्णराव ठुबे, रा.कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ.रिमझीम** यांचा शुभविवाह **दि.१९.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.मधुकर शिरोळे यांनी मंडळास **रू.५०००/–** देणगी दिली.
* श्री.दत्तात्रय किसन ठुबे, रा.कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ.योगीता** व श्री.चंद्रकांत नारायण चव्हाण, रा.कळवंतवाडी (आंबळे), ता.शिरूर, जि.पुणे यांचे सुपुत्र **चि.योगेश** यांचा शुभविवाह **दि.१९.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.दत्तात्रय ठुबे यांनी मंडळास **रू.३०००/–** देणगी दिली.
* श्री.अशोक हरीभाऊ धामणे, रा.सारोळा कासार, ता.जि.नगर यांचे सुपुत्र **चि.हर्षद** व श्री.राजेंद्र अर्जुन समुद्रे, रा.जवळा, ता.कळंब, जि.उस्मानाबाद यांची सुकन्या **सौ.तेजस्विनी** यांचा शुभविवाह **दि.१९.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.अशोक धामणे यांनी मंडळास **रू.१०००/–** देणगी दिली.
* श्री.प्रकाश सदाशिव ठुबे, रा.कान्हुर पठार यांची सुकन्या **सौ.गौरी** व कै.संजय माळवदकर, रा.पुणे यांचे सुपुत्र **चि.सौरभ** यांचा शुभविवाह **दि.२४.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.प्रकाश ठुबे यांनी मंडळास **रू.१०००/–** देणगी दिली.
* श्री.आबा पांडुरंग खोडदे, रा.गांजी भोयरे, यांचे सुपुत्र **चि.सचीन** व कै.बाळासाहेब निवृत्ती तरटे, रा.पळवे यांची सुकन्या **सौ.प्रिती** यांचा शुभविवाह **दि.२६.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.आबा खोडदे यांनी मंडळास **रू.१०००/–** देणगी दिली.
* श्री.पंडीतराव रंगनाथ राजेनिंबाळकर, रा.गांजीभोयरे यांचे सुपुत्र **चि.साकेत** व श्री.जयसिंग सदाशिव जाधव, रा.पळवे बु. यांची सुकन्या **सौ.प्रणिता** यांचा शुभविवाह **दि.३१.०५.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त प्रा.श्री.सुनील निंबाळकर यांनी मंडळास **रू.१०००/–** देणगी दिली.
* श्री.सिताराम पांडुरंग भागवत, रा.विरोली यांची सुकन्या **सौ.प्रियंका** व श्री.जयवंतराव भाऊराव कोठावळे, रा.सांगवी सुर्या यांचे सुपुत्र **चि.अमित** यांचा शुभविवाह **दि.०८.०६.२०१९** रोजी संपन्न झाला.
* श्री.सुभाष मळुजी घोरपडे, रा.चिंचोली यांचे सुपुत्र **चि.प्रियांक** व श्री.अशोक रोहिदास खेसे, रा.आमळे, ता.शिरूर, जि.पुणे यांची सुकन्या **सौ.वर्षा** यांचा शुभविवाह **दि.०९.०६.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.सुभाष घोरपडे यांनी मंडळास **रू.१०००/–** देणगी दिली.
* श्री.इम्तियाज माजीद मोमीन, रा.अळकुटी यांची सुकन्या **सौ.तैमीन** व श्री.हारून अमिन मोमीन, रा.धांदरफळ, ता.संगमनेर यांचे सुपुत्र **चि.अर्षद** यांचा शुभविवाह **दि.०९.०६.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.इम्तियाज मोमीन यांनी मंडळास **रू.१०००/–** देणगी दिली.
* श्री.विजयकुमार गोविंदराव ठुबे, रा.कान्हुर पठार यांचे सुपुत्र **चि.श्रेयश** व श्री.जनार्दन बबनराव दाते, रा.गारगुंडी यांची सुकन्या **सौ.स्नेहल** यांचा शुभविवाह **दि.१४.०७.२०१९** रोजी संपन्न झाला. त्यानिमित्त श्री.विजयकुमार ठुबे यांनी मंडळास **रू.५,०००/–** देणगी दिली.

## निधन वार्ता



* **सुमन दामोदर टोणगे,** रा.कोहोकडी, वय ६७ वर्षे यांचे **दि.१५.१०.२०१८** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री.संभाजी यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **साहेबराव नानासाहेब यादव,** रा.रांजणगाव, वय ९६ वर्षे यांचे **दि.०६.०४.२०१९** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री.चंद्रकांत यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



* **सिताराम लक्ष्मण झावरे,** रा.टाकळी ढोकेश्वर, वय ९२ वर्षे यांचे **दि.२३.०४.२०१९** रोजी निधन झाले.



* **आनंदराव नानासाहेब झंजाड,** रा.सुपे, वय ८१ वर्षे यांचे **दि.१४.०५.२०१९** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ सुपुत्र श्री.भास्करराव झंजाड यांनी मंडळास **रू.२१००/-** देणगी दिली.



* **सौ.उज्वला चंद्रकांत कटारिया,** रा.राळेगण थेरपाळ, वय ५६ वर्षे यांचे **दि.२०.०५.२०१९** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ पती श्री.चंद्रकांत व सासरे श्री.कचरदास कटारिया यांनी मंडळास प्रत्येकी **रू.१०००/-** देणगी दिली.

## अभिनंदन !



* **ॲड.विजय गोरखनाथ मैड,** रा.सुपे यांची भारत सरकारतर्फे **नोटरी** पदावर तसेच पुणे जिल्हा परिषदेच्या **कायदे सल्लागार** पदी नियुक्ती झाली.



* कु.**अभिकेश तुकाराम झावरे,** रा.गारगुंडी हा विद्यार्थी **हॉटेल मॅनेजमेंट**च्या पदवी परिक्षेत उत्तीर्ण झाला असून तो **नॅशनल कॉम्पीटीशन ऑफ कलीनरी (कुकींग)** च्या स्पर्धा परीक्षेमध्ये **ऑल इंडिया लेव्हलमध्ये पाचव्या क्रमांकाने** उत्तीर्ण झाला.



* **कु.सुहेल मलीक राजे,** रा.पारनेर याची डॉ.वैशंपायन मेडीकल कॉलेज, सोलापूर येथे एम.बी.बी.एस.च्या अभ्यासक्रमासाठी निवड झाली.

## निधन वार्ता



* **विठ्ठल सोनाजी शिर्के,** रा.कर्जुले हरेश्वर, वय ५२ वर्षे यांचे **दि.०२.०६.२०१९** रोजी निधन झाले. त्यांचे स्मृतीप्रित्यर्थ त्यांचे बंधु श्री.रामदास यांनी मंडळास प्रत्येकी **रू.१०००/-** देणगी दिली.


**मराठा समाजासाठी अग्रणी विवाह संस्था**

# बढे मराठा वधू-वर सूचक केंद्र

**संचालक : प्रा.रावसाहेब बढे** (M.A., B.Ed.)

**मोबाईल** - 9762043616, 9604131032

**विश्वनाथ हौ.सो.बिल्डींग नं.६०/८, दत्त मंदिराजवळ,**
**से.२८, गंगानगर, आकुर्डी, पुणे ४४**
**शाखा - अंबर प्लाझा-बी, एस.टी.स्टँड व**
**ए.डी.सी.सी.बँकेजवळ, अहमदनगर.**



www.badhemaratha.com Email : badhe.raosaheb@gmail.com

## आपण असे केले तर



✻ **श्री. अमृतराव क्षीरसागर,** रा. जामगाव यांनी त्यांचे जेष्ठ बंधू **कै.जयवंतराव बळवंतराव क्षीरसागर** यांचे **दि. ०२.०३.२०१९** च्या स्मृती दिना निमित्त मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



✻ **पिताश्री वै. सखाराम मारुतराव जगताप** (मृत्यु दिनांक ०६.०१.२०११) **व मातोश्री वै. विजयाबाई सखाराम जगताप** (मृत्यु दिनांक ०३.१०.२०१२) रा. गोरेगाव यांच्या स्मृतिप्रित्यर्थ त्यांचे सुपुत्र श्री.संदिप व श्री.सचिन यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



✻ **स्व. बसंतीबाई बन्सीलालजी गांधी** रा.सुपे यांच्या **दि.११.०५.२०१९** च्या स्मृती दिनानिमित्त त्यांचे सुपुत्र श्री.अशोकलालजी यांनी मंडळास **रू.५००/-** देणगी दिली.



✻ **कै.गिरीधारीलाल बिरदीचंद कटारिया** रा.तिखोल यांच्या **दि.०८.०८.२०१९** च्या स्मृतीदिनानिमित्त सुपुत्र श्री.नितीन यांनी मंडळास **रु.१०००/-** देणगी दिली.



✻ **श्री. उत्तमचंद रामचंद कर्नावट** रा. खडकवाडी यांनी त्यांचे सुपुत्र **स्व. मनोज** यांच्या दिनांक **१०.०८.२०१९** च्या स्मृती दिनाप्रित्यर्थ मंडळास **रु.११००/-** देणगी दिली.



✻ **श्री.बाळासाहेब हरिभाऊ येणारे,** रा. रायतळे यांनी त्यांचे सुपुत्र **चि. स्वराज** याच्या दिनांक **०९.०४.२०१९** च्या वाढ-दिवसानिमित्त मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



✻ **श्री.सुनील भगवंत शेटे,** रा.पारनेर यांनी त्यांचे सुपुत्र **चि.श्रेयस** याच्या **दि.३०.०७.२०१९** च्या वाढदिवसानिमित्त मंडळास **रू.२२२२/-** देणगी दिली.



✻ **कै.अरूण फकिरा हरेल**, रा.हिवरे कोरडा यांच्या **दि.०७.०७.२०१८** च्या स्मृतीदिनाप्रित्यर्थ सुपुत्र **श्री.तुषार** यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.



✻ **गिरीधरलालजी जेठमलजी शिंगवी,** रा.कान्हुर पठार, यांच्या **दिनांक १५.०४.२०१९** च्या स्मृती दिनानिमित्त सुपुत्र श्री.रमेशलालजी यांनी मंडळास **रू.१५००/-** देणगी दिली.

## सेवानिवृत्ती



✻ **श्री.बाळकृष्ण धोंडीबा लोंढे,** रा. कान्हुर पठार हे इंटरव्हेट इंडीया प्रा.लि.(बायफ) या कंपनीमध्ये मॅनेजर या पदावर कार्यरत होते. एकूण ३५ वर्षांच्या सेवेनंतर ते **दि. ३१.०५.२०१९** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



✻ **श्री.शंकर बाळू ढुबे,** रा. कान्हुर पठार हे विद्युत वितरण कंपनी महाराष्ट्र राज्य मध्ये सहाय्यक अभियंता या पदावर कार्यरत होते. एकूण ३६ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१९** रोजी सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.५०००/-** देणगी दिली.



✻ **श्री.नामदेव मारुती साबळे,** रा.रूई छत्रपती हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मध्ये उपअभियंता या पदावर कार्यरत होते. एकूण ३९ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१९** रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.१५००/-** देणगी दिली.



✻ **श्री.सतीश मधुकर भालेराव,** रा.पानोली हे ल्युमॅक्स इंडस्ट्रीजमध्ये प्लँट हेड या पदावर कार्यरत होते. एकूण ४० वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०३.२०१९** रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



✻ **श्री.अनिल दादासाहेब सुर्यवंशी,** रा. हंगे हे पिंपरी चिंचवड प्राधिकरण मध्ये अधिक्षक अभियंता या पदावर कार्यरत होते. एकूण २९ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१९** रोजी ते सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त त्यांनी मंडळास **रू.२०००/-** देणगी दिली.



✻ **सौ.रजनी अरूण नरसाळे,** रा.गोरेगाव या पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळामध्ये मुख्याध्यापीका या पदावर कार्यरत होते. एकूण ३५ वर्षांच्या सेवेनंतर **दि.३१.०५.२०१९** रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या. नोकरी करीत असताना त्यांना **'आदर्श शिक्षिका'** या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. तसेच त्यांनी साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था, सांगवी पुणे या संस्थेचे संचालक पद भूषविले होते. सेवानिवृत्तीनिमित्त त्यांनी मंडळास **रू.१०००/-** देणगी दिली.

कर्तृत्व पारनेरकरांचे

# कर्मवीर संभाजी यशवंत बोरूडे गुरूजी



(जन्म १.११.१९५२, मृत्यू ३.१.२०१८)

आपल्या शिक्षकी पेशाची पारनेर येथून सुरुवात करणारे, बाभुळवाडे या गावचे रहिवासी असलेले, विद्यार्थ्यांमध्ये अतिशय लोकप्रिय असणारे श्री. संभाजी यशवंत बोरूडे गुरूजी यांचे दि. ३ जानेवारी २०१८ रोजी हदयविकाराचे तीव्र धक्क्याने निधन झाले. गुरुजींचं असं अकस्मात जाणं सर्वांच्याच मनाला चटका लावणारं होतं. त्यांच्या जाण्याने त्यांचे कुटुंबीय, नातेवाईक, गावकरी, सहकारी शिक्षकवृंद, शिक्षण क्षेत्रातील मंडळी, विविध क्षेत्रातील त्यांचे विद्यार्थी या सर्वांचीच अपरिमित हानी झाली आहे.

शरीराने तुडतुडीत असलेल्या गुरूजींच्या सेवेची सुरुवात ४ ऑगस्ट १९७२ रोजी जीवन शिक्षण मंदीर, पारनेर (मुले) या शाळेतून झाली. सुरुवातीस त्यांच्याकडे चौथी ब चा वर्ग देण्यात आला होता. त्यांच्या सुरुवातींच्या बॅचच्या विद्यार्थ्यांमध्ये भास्कर औटी, शरद ठुबे, राजेंद्र चव्हाण, दत्ता शेटे, सुधाकर औटी, सुभाष कुटे, रामदास मते, बाळासाहेब व्यवहारे, एकनाथ पवार, शिवाजी बांगर, सतिश जाधव, ज्ञानेश्वर सातपुते, कारभारी औटी, यशवंत औटी, दादाभाऊ गाडगे, संजय गाडगे, शिवाजी ठुबे, अर्जुन ठुबे, भिमराव ठुबे, भिका ठुबे या व इतर अनेक विद्यार्थ्यांचा समावेश होता. याच बॅचमध्ये पुढे मी, हरिभाऊ औटी, हरिभाऊ शेरकर, तात्याबा शेरकर, श्रीपाद शेळके, अंकुश कोल्हे, सुभाष दुधाडे, रामदास कोल्हे परशुराम बोरुडे, भगवंत चत्तर, सुरेश झरेकर यासारखे वाड्यावस्त्यांवरील अनेक विद्यार्थी पाचवीत सहभागी झाले.

त्यावेळच्या बऱ्याचशा विद्यार्थ्यांचे आई-वडील एक अक्षरही न शिकलेले, शेतकरी, कष्टकरी असायचे. रात्रंदिवस काबाडकष्ट करायचे, मुलांना शिकवायचं एवढंच त्यांना माहीत असायचं. प्रसंगी पोटाला चिमटा काढून आईवडील मुलांना शिकवायचे. स्वत:ला शिकता आलं नाही. मुलांना शिकवायचंच, कोणालाही अडाणी ठेवायचं नाही या जिद्दीनं जवळपास सर्वच शेतकरी, कष्टकरी आई-वडील आपल्या मुलांसाठी कष्ट उपसत असतं. त्यांना शिकवत असतं. गुरूजी आईवडीलांच्या कष्टाची जाण विद्यार्थ्यांना सतत करून देत असत. विद्यार्थ्यांमधील प्रत्येक विद्यार्थ्यातील गुणांची पारख करुन, त्याप्रमाणे प्रत्येक विद्यार्थ्यावर पैलू पाडून त्यांचे जीवन घडविणारा, व्यक्तिमत्व घडवणारा बोरुडे गुरुजींसारखा रत्नपारखी शिक्षक त्यावेळेस लाभल्याने अनेक विद्यार्थ्यांचे जीवन घडले.

गुरुजींची शिकविण्याची हातोटी व कसब अनोखे होते. इंग्रजीसारखा अवघड विषय गुरुजी खूप सोपा करुन शिकवतं होते. आमचे गुरुजी आमच्यासाठी एवढं सारं करतात हे बघून आम्ही सर्व विद्यार्थी जीव तोडून अभ्यास करायचो. शिवाय आईवडीलांच्या कष्टांची जाणीव असायची. गुरुजींचे सुंदर अक्षर आमच्यापुढे आदर्श असायचं. गुरुजींचं वागणं,चालणं-बोलणं सारं काही आम्ही विद्यार्थी तंतोतंत अनुसरायचो. गुरुजींच्या व्यक्तिमत्वातील प्रत्येक पैलू आम्ही आमच्या व्यक्तिमत्वात उतरवायचा प्रयत्न करायचो. त्यामुळेच तर आज गुरुजींचे विद्यार्थी वेगवेगळया क्षेत्रात यशस्वीपणे वावरत आहेत. गुरुजींना फक्त हुशार मुलंच प्रिय असायची असं नव्हे तर प्रत्येक मुलातील गुण, त्याचा कल या बाबी ओळखून त्याच्यावर पैलू पाडायचे काम गुरुजी उत्कृष्टपणे करायचे. त्यामुळेच व्यवसायामध्ये यशस्वी ठरलेल्या श्री. रामदास मते, श्री. दत्ता शेटे यांच्यासारख्या आमच्या मित्रांचा गुरुजी नेहमी कौतुकाने उल्लेख करायचे.

त्याकाळी शनिवारी दुपारनंतर शनिवार-रविवारच्या सुटीसाठी गुरुजी त्यांचे गावी बाभुळवाडे येथे सायकलवर जायचे. गुरुजींनी असे सुटीसाठीही गावी जाऊ नये असे आम्हां विद्यार्थ्यांना वाटायचे. गुरुजींच्या वडीलांच्या लवकर जाण्यामुळे कुटुंबाचा सारा भार त्यांच्यावर असल्याचं आम्हांला आता कळतयं. सोमवारी गुरुजी कधी येतील याचीच आम्ही मुलं वाट पाहायचो. सायकलने येऊनही गुरुजी शाळेच्या वेळेपूर्वी हजर असायचे. गुरुजींना कधी उशीरा आलेलं आम्ही पाहिलं नाही. या काळात गुरुजी आमचे शिक्षक असतानाच स्वत:ही शिकत होते. त्यावेळेस एस. वाय. बी. ए. ला असलेल्या गुरुजींनी. त्यानंतर पुढे शिकत शिकत एम. ए. केले, बी. एड. केले. एवढेच नव्हे तर त्यांचे सहकारी मुळे गुरुजी यांनाही गुरुजींनी एम. ए. बी. एड. करायला भाग पाडले.

पाचवी- सहावीला असताना गुरुजी आम्हां विद्यार्थ्यांसाठी जीवापाड कष्ट घ्यायचे, आमच्यासाठी रात्र अभ्यासिका घ्यायचे. अ



माजी विद्यार्थी, बाभुळवाडे यांच्याहस्ते संभाजी बोरूडे गुरूजी यांचा सत्कार



व ब च्या वर्गातील दोन्हीही मुले अभ्यासिकेला असायची. या रात्र अभ्यासिकेचं सर्व नियंत्रण गुरुजींकडेच असायचे. दोन्ही तुकडयां-मधील मिळून ७०-८० तरी मुले या अभ्यासिकेस असायची. शिवाय पुढच्या वर्गातील मुलेही रात्र अभ्यासिकेसाठी असायची. त्यातील बहुतांश मुले ही वस्त्यांवरील असल्यामुळे अभ्यासानंतर रात्री मुलं शाळेतच मुक्कामास असायची. एवढया सा-या मुलांना सांभाळायची कठीण जबाबदारी गुरुजी त्यावेळेस सहज पेलत होते. पाचवी, सहावीला असताना आम्ही विद्यार्थी इंग्रजीचा खूप अभ्यास करायचो. त्यामुळेच मला व माझ्या इतर बऱ्याचशा मित्रांनाही इंग्रजी विषयात ९९, ९८, ९७ असे गुण असायचे.

आम्ही पाचवीत असताना व आमच्या पुढच्या वर्गातील पोपट हांडे, सुरेश पुजारी, संजीव सोनवणे, विठ्ठल औटी, पोपट शिंदे या मुलांची बॅच सहावीत असताना दोन्ही वर्गाच्या आम्हां सर्व मुलांना गुरुजींनी टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे द्वारा घेण्यात येणा-या Pre Elementary Exam. in English या परिक्षेला व त्यानंतरच्या पुढील वर्षी Elementary Exam. in English या परिक्षेला बसविले होते. सर्वच मुले दोन्ही परिक्षांत उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाली होती. मला व माझ्या पुढील वर्गातील मित्र पोपट हांडेला दोन्ही परिक्षेत First Class with Distinction मिळाले होते. प्रत्येक गोष्टींचा सर्वांगीण अभ्यास करुन ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा त्यांचा सतत प्रयत्न असायचा. त्यांचा सर्वच बाबींचा खूप अभ्यास असायचा.

गुरुजींच्या सुंदर गावाचे म्हणजेच बाभूळवाडयाचे आम्हां विद्यार्थ्यांना खूप आकर्षण असायचे. डोंगराच्या कुशीत वसलेले व या डोंगरावर दोन मंदीरे व त्यांचे कळस मिरवणारं गुरुजींचे गाव दूरुनही खूप आकर्षक दिसायचं. आमच्या आवडत्या गुरुजींचे हे गाव बघून मला मनोमन खूप आनंद व्हायचा. त्यानंतर जेव्हा जेव्हा वडझिरे, देवीभोयरे, निघोज, अळकुटी अशा गावांकडे आमचं जाणं व्हायचं तेव्हा तेव्हा आम्हां विद्यार्थ्यांचा पहिला फोन गुरुजींना असायचा आणि बाभुळवाडयाला जाऊन गुरुजींना कसं भेटता येईल असा आम्हां विद्यार्थ्यांचा प्रयत्न असायचा. गुरुजींची आठवण झाल्याबरोबर गाडी काढून तडक बाभूळवाडयाला जाऊन गुरुजींना भेटून येणा-या दत्ता शेटे, राजेंद्र चव्हाण, डॉ. शरद ठुबे यांना मी अनेकदा पाहिले आहे. याशिवाय पारनेरच्या बाजाराच्या दिवशी म्हणजेच रविवारी गुरुजींची भेट झाली तर ती आम्हां विद्यार्थ्यांसाठी एक पर्वणी असायची. गुरुजींच्या भेटीमुळे त्यांच्याशी संवाद साधणे, सुख-दुखा:ची देवाण घेवाण करणं, गुरुजींकडून आवश्यक मार्गदर्शन मिळविणं व जीवनाच्या वाटचालीसाठी नवी ऊर्जा मिळवणं हे आम्हां सर्व विद्यार्थ्यांचे उद्दीष्ट असायचं. विद्यार्थ्यांमध्ये गुरुजींची अफाट लोकप्रियता होती. कारण प्रत्येकाचं जीवन घडविण्यामध्ये त्यांचं महत्वपूर्ण योगदान होतं. बोरूडे गुरुजींच्या बरोबरीनेच श्री.मुळे गुरुजी, श्री. देशमुख गुरुजी, श्री. गायकवाड गुरुजी, श्री. देशमाने गुरुजी, श्री. झरेकर गुरुजी, कै. पोळ गुरुजी, कै. शहाणे गुरुजी अशा आमच्या इतर गुरुजन वर्गाचा त्याचप्रमाणे त्यावेळी मुख्याध्यापक असलेल्या कै.नामदेव हरी चेडे यांच्या कडक शिस्तीचा आमच्या जडणघडणीमध्ये महत्वाचा वाटा आहे.

गुरूजींचा शैक्षणिक कामात विद्यार्थ्यांना घडविण्यात हातखंडाच होता. पण याशिवाय ते त्यांचे कुटुंब, समाज व इतर सामाजिक कार्यात सतत आघाडीवर असत. **गुरूजी डी.एड. झाल्यानंतर नोकरीस लागले. परंतू त्यांनी त्यात समाधान न मानता ते पुढे एम.ए.बी.एड. होऊन त्यांनी शैक्षणिक कामात आपला ठसा उमटविला. यामुळेच त्यांना पुढे जिल्हा परिषद केंद्र प्रमुख म्हणून पदोन्नती मिळाली व त्यानंतर सुद्धा परत ते शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झाले.**

ते अहमदनगर जिल्हा शिक्षक सहकारी बँकेच्या संचालक पदी काम करीत असताना त्यांनी अनेक धडाडीचे निर्णय घेतले. बाभुळवाडे सोसायटीच्या चेअरमनपदी २०१४ मध्ये त्यांची बिनविरोध निवड झाली. बाभुळवाड्याचे केदारेश्वर ट्रस्टच्या सचीवपदी त्यांनी अनेक वर्षे काम केले. तसेच केदारेश्वर मंदिराच्या महाशिवरात्र उत्सवाची त्यांनी प्रामाणिकपणे २० वर्षे धुरा सांभाळली. शिक्षक संघटनेत अनेक पदे भूषविताना त्यांनी शिक्षकांच्या प्रश्नांची जाण ठेवून काम केले. स्वतःच्या मुलामुलींना सुद्धा त्यांनी गुणवत्तापुर्ण शिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे केले. त्यांच्या तिन्ही मुली शिक्षिका असून त्या गुरूजींचेच काम पुढे चालवित आहेत. मुलगा सुद्धा महाराष्ट्र राज्य सरकारमध्ये कार्यरत आहे.

- **रामदास पुजारी,** सहाय्यक वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण,पुणे

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## जमा-खर्च पत्रक १.४.२०१८ ते ३१.०३.२०१९ अखेरचे

| जमा | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **आरंभीची शिल्लक** | | |
| रोख | ८४८.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१२ | ४,८९३.०० | |
| स्टेट बँक ४९७८ | २९,३५१.७५ | |
| महानगर को–ऑप.बँक १६१ | २,७७,३६०.८० | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | ६५,१२१.०५ | |
| | ---------- | ३,७७,५७४.६० |
| बचत ठेव व्याज खाते | | २७,४११.०० |
| मुदत ठेव व्याज खाते | | २,५४२.०० |
| वसतिगृह शुल्क | | १२,०५,७७५.०० |
| फॉर्म फी | | २,१६०.०० |
| वसतिगृह दंड | | १२,६००.०० |
| वसतिगृह विज बिल जमा | | ८,५७५.०० |
| डिस्काऊंट जमा | | १,७५०.०० |
| रद्दी जमा | | १,९००.०० |
| इमारत निधी | | १३,७९,१८९.०० |
| **बील देणे –** | | |
| गोल्डन इलेक्ट्रीकल्स | | ३५,०००.०० |
| **अनामत –** | | |
| घशींग | २०,०००.०० | |
| नाटेकर | ५,०००.०० | |
| सचिन औटी | १२,५०० | |
| | ------ | ३७,५००.०० |
| वसतिगृह अनामत (डिपॉझीट) | | १,३७,०००.०० |
| टी.डी.एस. ठेकेदार | | २२,२११.०० |
| मुदत ठेव जमा | | ८,००,०००.०० |
| **सुरक्षा अनामत –** बांधकाम | | |
| अवधुत इलेक्ट्रिकल्स | | १,४००.०० |
| **अनामत (इमारत निधी)** | | |
| श्रीकृष्ण कॅब | | ५,०००.०० |
| **एकूण रक्कम** | | **४०,५७,५८७.६०** |

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| बँक चार्जेस | ६८४.४० | |
| दिवाळी बोनस | २२,०००.०० | |
| व्यवस्थापक पगार | १,५०,०००.०० | |
| सहव्यवस्थापक पगार | ४७,४००.०० | |
| स्विपर पगार | ६३,०००.०० | |
| वॉचमन पगार | १,६२,०००.०० | |
| शैक्षणिक मदत | ३,०००.०० | |
| विज बिल खर्च | ९७,५३०.०० | |
| कर्ज व्याज | ३,४८४.०० | |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | ३५,८५५.०० | |
| छपाई स्टेशनरी खर्च | ५०,६२१.०० | |
| पोस्टेज | ५,८०५.०० | |
| मासिक सभा खर्च | ४,१३६.०० | |
| नविन पाणी कनेक्शन | ३०,९७४.०० | |
| लिगल फी | १८,०००.०० | |
| पी.सी.एम.सी. कर | ४६,०४४.०० | |
| पाणीपट्टी | ६५५.०० | |
| लिहीणावळ खर्च | १७,५००.०० | |
| ऑडिट फी | १२,५००.०० | |
| वार्षिक समारंभ खर्च | ६२,८४७.०० | |
| प्रवास खर्च | १७,३१०.०० | |
| झेरॉक्स व टायपींग खर्च | ६,१५०.०० | |
| वेबसाईट खर्च | ९,०००.०० | |
| वैद्यकीय मदत | १०,०००.०० | |
| समारंभ खर्च | १,७००.०० | |
| | -------- | ८,७८,१९५.४० |
| **फर्निचर अनामत –** | | |
| पार्श्वनाथ इलेक्ट्रिकल्स | | २५,०००.०० |
| **अनामत –** | | |
| घशींग | २०,०००.०० | |
| नाटेकर | २०,०००.०० | |
| सचिन औटी | १२,५००.०० | |
| | -------- | ५२,५००.०० |
| पी.सी.एम.सी.डिपॉझिट | | १०,०००.०० |
| वसतिगृह अनामत (डिपॉझिट) | | १,०२,०००.०० |
| टी.डी.एस. कॉन्ट्रॅक्टर | | २२,२११.०० |
| मुदत ठेव कर्ज | | ७,००,०००.०० |
| बांधकाम खर्च | | ३,७०,८८०.०० |
| रेन वॉटर हार्वेस्टींग | | ५०,७५०.०० |
| फर्निचर व इलेक्ट्रिकल्स | | ९३,५२६.०० |
| इलेक्ट्रीकल मोटर | | १६,५००.०० |
| लॅपटॉप खरेदी | | ३६,४९०.०० |
| प्रिंटर खरेदी | | १०,९९९.०० |
| सोलर सिस्टीम | | ४,५६,७५०.०० |
| **अखेर शिल्लक** | | |
| रोख | ५६८२.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१२ | ५,०६७.०० | |
| स्टेट बँक ४९७८ | ६,०५,८७४.७५ | |
| महानगर को–ऑप.बँक १६१ | ९९,६६७.२० | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | २,९०,४९५.२५ | |
| | --------- | १०,०६,७८६.२० |
| **एकूण रक्कम** | | **४०,५७,५८७.६०** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## उत्पन्न खर्च पत्रक १.४.२०१८ ते ३१.३.२०१९ अखेरचे

| खर्च | रक्कम रू. | रक्कम रू. | उत्पन्न | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|---|---|---|
| बँक चार्जेस | ६८४.०० | | बचत ठेव व्याज खाते | २७,४११.०० | |
| दिवाळी बोनस | २२,०००.०० | | मुदत ठेव व्याज खाते | २,५४२.०० | |
| व्यवस्थापक पगार | १,५०,०००.०० | | | ------- | २९,९५३.०० |
| सहव्यवस्थापक पगार | ४७,४००.०० | | | | |
| स्विपर पगार | ६३,०००.०० | | वसतिगृह शुल्क | १२,०५,७७५.०० | |
| वॉचमन पगार | १,६२,०००.०० | | फॉर्म फी | २,१६०.०० | |
| शैक्षणिक मदत | ३,०००.०० | | वसतिगृह दंड | १२,६००.०० | |
| विज बिल खर्च | ९७,५३०.०० | | वसतिगृह विज बिल जमा | ८,५७५.०० | |
| कर्ज व्याज | ३,४८४.०० | | डिस्काऊंट जमा | १,७५०.०० | |
| देखभाल व दुरुस्ती खर्च | ३५,८५५.०० | | रद्दी जमा | १,९००.०० | |
| छपाई स्टेशनरी खर्च | ५०,६२१.०० | | | ---------- | १२,३२,७६०.०० |
| पोस्टेज | ५,८०५.०० | | | | |
| मासिक सभा खर्च | ४,१३६.०० | | | | |
| नविन पाणी कनेक्शन | ३०,९७४.०० | | | | |
| लिगल फी | १८,०००.०० | | | | |
| पी.सी.एम.सी. कर | ४६,०४४.०० | | | | |
| पाणीपट्टी | ६५५.०० | | | | |
| लिहीणावळ खर्च | १७,५००.०० | | | | |
| ऑडिट फी | १२,५००.०० | | | | |
| वार्षिक समारंभ खर्च | ६२,८४७.०० | | | | |
| प्रवास खर्च | १७,३१०.०० | | | | |
| झेरॉक्स व टायपींग खर्च | ६,१५०.०० | | | | |
| वेबसाईट खर्च | ९,०००.०० | | | | |
| वैद्यकीय मदत | १०,०००.०० | | | | |
| समारंभ खर्च | १,७००.०० | | | | |
| | -------- | ८,७८,१९५.४० | | | |
| घसारा | | २,९१,९२४.०० | | | |
| नफा ताळेबंदास वर्ग | | ९२,५९३.६० | | | |
| **एकूण रक्कम** | | **१२,६२,७१३.००** | **एकूण रक्कम** | | **१२,६२,७१३.००** |

| **सुनील पोटे** | **मधुकर शिरोळे** | **हौसाराम घोडके** | **मे.के.बी.साळुंके अँड कं.** |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी मदत**
**म्हणजेच आपल्या मुलांच्या भवितव्यासाठी मदत !**
**मंडळाच्या वसतिगृह बांधकामासाठी आपण स्वतः मदत करा,**
**आपल्या नातेवाईक, मित्रांना मदत करायला सांगा !**

# पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे

## ताळेबंद पत्रक ३१.०३.२०१९ अखेरचे

| जिंदगी व देणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **ट्रस्ट निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ७३,२९४.०० |
| **इतर निधी** | | |
| **इमारत निधी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,७५,८०,८८८.०३ | |
| अधिक जमा – चालू वर्षी | १३,७९,१८९.०० | |
| | | १,८९,६०,०७७.०० |
| **शैक्षणिक फंड –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९६,७२५.०० |
| **अंत्यविधी जमा निधी –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,३०,१२२.०० |
| **बील देणे चालू वर्षी** | | |
| गोल्डन इलेक्ट्रीकल्स | | ३५,०००.०० |
| **वसतिगृह अनामत –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १,५२,४५६.०० | |
| अधिक जमा – चालू वर्षी | १,३७,०००.०० | |
| | २,८९,४५६.०० | |
| वजा – चालू वर्षी | १,०२,०००.०० | |
| | | १,८७,४५६.०० |
| **उत्पन्न खर्च खाते –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | २०,६४,२१९.५७ | |
| चालू वर्षी | ९२,५९३.६० | |
| | | २१,५६,८१३.१७ |
| **टेंडर अनामत –** | | |
| अभिजीत कन्स्ट्रक्शन | १,७२,६००.०० | |
| अवधुत इलेक्ट्रिकल्स | ८,८००.०० | |
| | | १,८१,४००.०० |
| **अनामत (इमारत निधी)** | | |
| श्रीकृष्ण कॅब चालू वर्षी | | ५,०००.०० |
| सुरक्षा अनामत – बांधकाम | | |
| अभिजीत कन्स्ट्रक्शन | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,७३,०००.०० |
| अवधूत इलेक्ट्रीकल | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ७,३६४.०० | |
| चालू वर्षी | १,४००.०० | |
| | | ८,७६४.०० |
| **एकूण रक्कम** | | **२,२०,०७,६५१.२०** |

| स्थावर मालमत्ता व येणी | रक्कम रू. | रक्कम रू. |
|---|---|---|
| **स्थिर मालमत्ता** | | |
| **जमीन खरेदी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | ८,४५,३११.०० |
| **इमारत बांधकाम** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | १५१,१३,३२३.०० | |
| अधिक जमा – चालू वर्षी | ३,७०,८८०.०० | |
| | | १,५४,८४,२०३.०० |
| **टी.डी.आर. –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | २१,१३,१०५.०० |
| **पी.सी.एम.सी. चार्जेस (बांधकाम)** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,५३,१००.०० |
| **बोअरवेल –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०५०.०० |
| **रेन वॉटर हार्वेस्टींग –** चालू वर्षी | | ५०,७५०.०० |
| **मोटर पंप –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ९,५१२.०० | |
| अधिक जमा – चालू वर्षी ३० सप्टें.आधी | १६,५००.०० | |
| | २६,०१२.०० | |
| वजा – घसारा ४०% | १०,४०५.०० | |
| | | १५,६०७.०० |
| **फर्निचर व फिक्चर्स –** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ७,८४,९२१.०० | |
| अधिक जमा चालू वर्षी ३० सप्टें.आधी | ९३,५२६.०० | |
| | ८,७८,४४७.०० | |
| वजा – घसारा १०% | ८७,८४५.०० | |
| | | ७,९०,६०२.०० |
| **लॅपटॉप** | | |
| चालू वर्षी ३० सप्टें.नंतर | ३६,४९०.०० | |
| वजा घसारा – ४०% | ७,२९८.०० | |
| | | २९,१९२.०० |
| **वॉटर प्युरिफायर खरेदी** | | |
| मागील ताळेबंदाप्रमाणे | ३,६९१.०० | |
| वजा – घसारा ४०% | १,४७६.०० | |
| | | २,२१५.०० |
| **प्रिंटर** | | |
| चालू वर्षी ३० सप्टें.नंतर | १०,९९९.०० | |
| वजा घसारा – ४०% | २,२००.०० | |
| | | ८,७९९.०० |
| **सोलर सिस्टीम** | | |
| चालू वर्षी ३० सप्टें.नंतर | ४,५६,७५०.०० | |
| वजा घसारा – ४०% | १,८२,७००.०० | |
| | | २,७४,०५०.०० |
| **वृक्ष संवर्धन ठेव –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | ९,०००.०० |
| **अनामत – पार्श्वनाथ इंजिनियरींग –** चालू वर्षी | | २,५०,०००.०० |
| **अनामत – नाटेकर –** चालू वर्षी | | १५,०००.०० |
| **पी.सी.एम.सी. चार्जेस (बांधकाम) –** चालू वर्षी | | १०,०००.०० |
| **एम.एस.सी.बी. डिपॉझिट –** मागील ताळेबंदाप्रमाणे | | १०,०००.०० |
| **टी.डी.एस. २०१६–१७** | | २०,२७२.०० |
| **टी.डी.एस. २०१७–१८** | | ९,६०९.०० |
| **रोख व बँक शिल्लक –** | | |
| रोख | ५,६८२.०० | |
| बँक ऑफ महाराष्ट्र ५३५१२ | ५,०६७.०० | |
| स्टेट बँक ४९७८ | ६,०५,८७४.७५ | |
| महानगर को–ऑप.बँक १६१ | ९९,६६७.२० | |
| सुवर्णयुग सह.बँक १७७० | २,९०,४९५.२५ | |
| | | १०,०६,७८६.२० |
| **एकूण रक्कम** | | **२,२०,०७,६५१.२०** |

| सुनील पोटे | मधुकर शिरोळे | हौसाराम घोडके | मे.के.बी.साळुंके अँड कं. |
|---|---|---|---|
| सेक्रेटरी | उपाध्यक्ष | अध्यक्ष | लेखा परीक्षक |

।। विना सहकार नाही उद्धार ।।

# श्री साईबाबा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित



नोंदणी क्र.: पीएनए/एचएलआय/आरएसआर /९४१/१९९३-९४ स्थापना : ३ मे १९९३

आशियाना टॉवर्स, सातपुडा हौसिंग सोसा. सांगवी, पुणे - २७. मो.: ९०११९५८११०

मूळच्या अ'नगर जिल्ह्यातील परंतु पुणे येथे स्थायीक झालेल्या मंडळींनी सामाजिक जाणीवेचे भान ठेवून स्थापित केलेली व अल्पावधीत सभासदांच्या विश्वासास पात्र ठरलेली पतपेढी. संस्थेची वैशिष्ट्ये–

✤ संस्थेच्या मालकीचे संगणकीकृत कार्यालय ✤ तत्पर सेवा ✤ ठेवीवर आकर्षक व्याजदर
✤ सभासदांच्या गुणवान पाल्यांचा यथोचित सत्कार ✤ विनयशील कर्मचारी वर्ग
✤ सभासदांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यावर जास्तीत जास्त भर.



श्री.सखाराम कोंडिबा गागरे
संस्थापक अध्यक्ष




श्री.अरुण मार्तंड नरसाळे
अध्यक्ष




श्री.कुंडलिक विश्वनाथ घोडके
उपाध्यक्ष



श्री.पोपटराव आनंदराव जाधव
संचालक



श्री.गोविंद दामोधर ढोरमले
संचालक



श्री.पांडुरंग विश्वनाथ चाफे
संचालक



श्री.नवीनचंद्र श्रीकिसन नाबरिया
संचालक



श्री.निशांत रंगनाथ गिरी
संचालक




सौ.अलका दिलीप हरेल
संचालिका



सौ.राधाबाई मुरलीधर चौधरी
संचालिका



श्री.सोमा भिमा दाते
संचालक




## -: विशेष सूचना :-

☺ **मंडळाचे विद्यार्थी वसतिगृह सुरु असून विद्यार्थ्यांना वसतिगृहात प्रवेश देणे सुरु आहे.**

☺ पुरस्कार, शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, उद्योगधंदा, नोकरीतील बढती तसेच सेवानिवृत्तीची तारीख या संबंधात आपल्या किंवा आसपासच्या पारनेर तालुक्यातील व्यक्तींची फोटोसहीत माहिती कळवावी.

☺ आपल्या मुलामुलींच्या तसेच नातेवाईकांच्या शुभविवाहाची बातमी संवादमध्ये छापली जाते. त्याकरीता एक लग्नपत्रिका मंडळाच्या पत्त्यावर पाठवावी किंवा फोनने कळवावे.

☺ आपल्या नातेवाईकांचे दुःखद निधन झाल्यास मंडळास अवश्य कळवावे. जेणेकरून इतरसुद्धा आपल्या दुःखात सहभागी होतील.

☺ विद्यार्थ्यांच्या १०वी, १२वी, इंजिनियरींग, मेडीकल व इतर सर्व शाखांचे परीक्षांचे मार्क्स कळविल्यास व फोटो पाठविल्यास सदर विद्यार्थ्यांचे अभिनंदन 'संवाद' मधून करण्यात येईल.

☺ कृपया घरचा, नोकरीचा बदललेला पत्ता व फोन नंबर त्वरीत कळवावा.



संपादकीय पत्ता :
**इंजि. विजयकुमार ढुबे**
ए-६०५, ''शुभकल्याण'' नांदेड सिटी,
सिंहगड रोड, पुणे ४११०४१.
मो.: ९४२२०२६२२५

ही पत्रिका पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे साठी प्रकाशक श्री.सुनील कुंडलीक पोटे व मुद्रक श्री.सुनील मुरलीधर तोटे (suniltote11@gmail.com) (M: 9823415531) यांनी मे.चैतन्य एंटरप्रायजेस, ६२५, नारायण पेठ, पुणे ४११०३० येथे छापून **'पारनेर भवन', मंगलनगर, गल्ली नं.८, वाकड रोड, डांगे चौक, थेरगाव, पुणे - ४११०३३** येथून फक्त सभासदांसाठी प्रसिद्ध केली.

या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखांशी अथवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**बुक - पोस्ट**
(छापील मजकूर)

Website :
http://www.parnermitramandalpune.com/

श्रीमान ______________________

______________________

______________________

______________________

पत्रव्यवहाराचा पत्ता :
**श्री. हौसाराम घोडके**
अध्यक्ष, पारनेर तालुका मित्र मंडळ, पुणे
ए-१/१, यशोधन सोसा., चिंतामणी नगर भाग-२,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७. मो.: ९४२०६९६७९०